देशोन्नती

# ब्ल्यु बर्ड इंटरनॅशनल स्कुलमध्ये सायबर सेक्युरिटी कार्यशाळा

देशोन्नती वृत्तसंकलन



**औसा** : तालुक्यातील आलमला येथील श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित ब्ल्यु बर्ड इंटरनॅशनल स्कुल, आलमला, राजश्री शाहु महाविद्यालय, लातूर व क्विकहिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने शाळेच्या प्राचार्या स्वाती कापसे यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या उपक्रमाचे आयोजन ब्ल्यु बर्ड इंटरनॅशनल स्कुलमध्ये करण्यात आले होते. हा उपक्रम मागील तीन वर्षापासुन लातूर जिल्हा मधील विविध संस्थामध्ये राबविला जात होता. या उपक्रमाअंतर्गत सायबर सेक्युरिटी कार्यशाळा आलमला येथील ब्ल्यु बर्ड इंटरनॅशनल स्कुलमध्ये विद्यार्थ्यासाठी आयोजित करण्यात आले होते. या कार्यशाळेत शाहु महाविद्यालयातील माहिती तंत्रज्ञान विभागातील राजकन्या राजमाने व श्रावणी लाडे या विद्यार्थिनींनी सोशल मिडीया इंटरनेटचा अयोग्य व अतिवापर कसा घातक ठरतो आणि डिजीटल फसवणुकीपासुन सावधानता कशी बाळगायची अशी विविध उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांना त्या बाबतीत सखोल असे मार्गदर्शन केले. त्यासोबतच सायबर सेल, सायबर गुन्हा नोंदणी व हेल्पलाईन बद्दल माहिती दिली. या कार्यशाळेस शाळेतील सर्व विद्यार्थी मोठया संख्येने तसेच गिता चव्हाण, विनोद पंडुळे, मंजुरपाशा शेख, परमेश्वर चिलखे, सोहेल शेख, सौरभ वडे, तानाजी जाधव, फिरदोस सय्यद, वैष्णवी ढेकणे, नितु भंडारी, रश्मी दुधनकर, सुप्रिया जाधव, पायल घायाळ, ममता बोकडे, दिपा पोतदार, ज्योती चलवाड, महारुद्र जवादे, मोहम्मद मुलानी, सतिष निलंगेकर, नौशाद फकिर, आशा राठोड उपस्थित होते

Latur Edition
Aug 19, 2025 Page No. 3
Powered by: erelego.com